शंकर भोलाभाला जगाचा पालनवाला

सविस्तर वृत्त पान २ वर

www.attalmat.com

अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-24 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, १६ फेब्रुवारी 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

वर्कऑर्डर फसवी, निधी खरा! पीडब्ल्यूडीमध्ये २५० कोटींचा महाघोटाळा?

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

बांधकाम विभागात (PWD) बोगस वर्क ऑर्डर आणि क्यूआर कोड गैरव्यवहारातून तब्बल २५० कोटी रुपयांच्या कामांवर संशय निर्माण झाल्याने राज्यात खळबळ उडाली आहे. जिल्हा नियोजन समिती (DPC) मंजूर कामांमध्ये नियमबाह्य फेरफार करून निधी वळवण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत चौकशीसाठी समिती नेमण्यात आली आहे.

कंत्राटी साखळीवर २५० कोटींची सावली

क्यूआर कोड एकाचा, कंत्राट दुसऱ्यालाच?

बांधकाम विभागातील काही कामांचे क्यूआर कोड एका नावाने, तर संबंधित वर्क ऑर्डर दुसऱ्या कंत्राटदाराच्या नावाने जारी झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे निविदा प्रक्रियेची पारदर्शकता आणि कामांच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. सरत्या आर्थिक वर्षात DPCतून PWDकडे वर्ग झालेल्या निधीपैकी सुमारे १०० कोटींची कामे संशयास्पद असल्याची चर्चा रंगली आहे.

चार आठवड्यांत अहवाल- या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. समितीला चार आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कागदपत्रांची पडताळणी, मंजुरी-प्रक्रिया, निधी वितरण आणि प्रत्यक्ष कामांची स्थिती यांची सखोल तपासणी होणार आहे.

'रॅकेट'ची शक्यता?- या बोगसगिरीमागे काही कंत्राटदारांसह विभागातील टेंडर क्लार्क, विभागीय लेखाधिकारी, कार्यकारी अभियंता अशी साखळी गुंतलेली असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही कंत्राटदार या गैरव्यवहारातून गब्बर झाल्याची चर्चा असून, यापूर्वीही अशाच प्रकारे अनियमितता झाली असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

राजकीय वतुर्ळात संताप- हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर प्रशासन हलले. विरोधकांनी याला जनतेच्या पैशांवर डल्ला असे संबोधत दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

पुढे काय? - चौकशी समितीचा अहवाल निर्णायक ठरणार आहे. आरोप सिद्ध झाल्यास मोठ्या प्रमाणावर निलंबन, फौजदारी गुन्हे आणि काळ्या याद्यांमध्ये समावेश अशा कठोर कारवाईची शक्यता आहे. जनतेच्या पैशांवर संशयाची सावली पडली असताना, आता सगळ्यांचे लक्ष चौकशी अहवालाकडे लागले आहे.

चौकशीसाठी तांत्रिक ज्ञान, नियम, कायद्याचा ज्ञान असणारा, आर्थिक विभागाचा ज्ञान असणाऱ्या अधिकाऱ्याकडून चौकशी झाली पाहिजे - आमदार अंबादास दानवे

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) सुमारे २५० कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याची चर्चा रंगू लागली असून, या प्रकरणाने राजकीय वतुर्ळात खळबळ उडवली आहे. विविध कामांच्या मंजुरी, निविदा प्रक्रिया आणि बिलांच्या देयकांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. काही ठेकेदारांना नियमबाह्य लाभ देण्यात आल्याची तसेच अपूर्ण कामांसाठीही मोठ्या प्रमाणावर निधी वितरित केल्याची तक्रार पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अंबादास दानवे यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी राज्य सरकारकडे उच्चस्तरीय समितीमार्फत तपास करावा, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे, अशी ठाम भूमिका मांडली आहे.

दानवे म्हणाले, जनतेच्या पैशांचा अपव्यय कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. जर २५० कोटींच्या घोटाळ्याची शंका निर्माण होत असेल, तर सरकारने पारदर्शकपणे चौकशी करून सत्य बाहेर आणावे. दोषींना वाचवण्याचा प्रयत्न झाला, तर जनतेत तीव्र संताप उसळेल.

अतुल चव्हाण यांनी नोकरी सोडून पक्षप्रवेशच करून टाकावा

"पीडब्ल्युडीच्या मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी आपला पुतण्या निखिल चव्हाण हा जि.प. अध्यक्ष व्हावा यासाठी प्रयत्नरत आहेत.काही जणांना त्यांची फोन देखील आलेले आहेत.एखादा जबाबदार अधिकारी असे प्रयत्न करत हे नवीनच आहे. मला वाटत त्यांनी नोकरी सोडून पक्षप्रवेशच करून टाकावा. या सर्वांवर शिवसेना नजर ठेवून आहे हे मात्र नक्की

- अंबादास दानवे

चौकशीत कुणीही दोषी आढळल्यास त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई

"संभाजीनगरात पीडब्ल्यूडी विभागात बोगस वर्क ऑर्डरचा घोटाळा झाल्याची बाब समोर आली आहे. यांची चौकशी करून जर कुणी दोषी असेल तर लवकरात लवकर यावर कारवाई केली जाईल, अशी माहिती मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी दिली आहे. या संदर्भात मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. चौकशीत कुणीही दोषी आढळल्यास त्यांच्यावर तात्काळ आणि कठोर कारवाई करण्यात येईल. विभागीय स्तरावर कागदपत्रांची पडताळणी सुरू असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. बोगस वर्क ऑर्डरच्या माध्यमातून निधीचा अपहार झाला का, याबाबत तपास केला जात आहे. दरम्यान, या प्रकारामुळे विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पारदर्शकतेबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. चौकशीचा अहवाल समोर आल्यानंतरच संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

- मुख्य अभियंता अतुल चव्हाण

सार्वजनिक बांधकाम विभाग 'खाते'

रस्ते, कामे आणि बिले संशयाच्या भोवऱ्यात; संदीप देशपांडेंचे गंभीर आरोप

राज्यात सर्वच ठिकाणी असे प्रकार होत असल्याचा संशय?

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा दावा करत सामाजिक कार्यकर्ते संदीप देशपांडे यांनी लिहिटीअंसह गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या या लिहिटीअंमुळे राज्याच्या प्रशासकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून या प्रकरणाची सखोल आणि स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

देशपांडे यांनी त्यांच्या लिहिटीअंमध्ये रस्ते बांधकाम व दुरुस्तीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून कागदोपत्री मात्र उच्च दर्जाच्या कामाचे दाखले देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. काही ठिकाणी कामे अपूर्ण असतानाही ती पूर्ण झाल्याचे दाखवून कोटयवधी रुपयांची बिले काढण्यात आल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे.

तसेच निविदा प्रक्रिेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत, काही ठेकेदारांना नियमबाह्य पद्धतीने कामे देण्यात आल्याचे देशपांडे यांनी म्हटले आहे. या कथित गैरप्रकारांमुळे सरकारी तिजोरीचे मोठे नुकसान झाल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली असून संबंधित कागदपत्रे व स्थळपाहणीत लिहिटीअंतील हे पुरावे म्हणून सादर केल्याचेही त्यांनी सांगितले.

भ्रष्टाचाराच्या मुद्यावर आमदार गप्प

(PWD) खात्यातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा प्रकार घडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सामान्य कंत्राटदारांच्या वैशांचा असा गैरवापर होत असेल तर तो अत्यंत गंभीर विषय आहे, असे देशपांडे यांनी म्हटले आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी आणि संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी त्यांची मागणी आहे. दरम्यान, या आरोपांवर शासक विभागाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मात्र, विभागीय पातळीवर प्राथमिक माहिती घेतली जात असल्याचे सूत्रांकडून समजते. आरोपांची सत्यता तपासल्यानंतरच पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल, असेही संकेत मिळत आहेत.

या प्रकरणामुळे (PWD) मधील कामकाज, विकासकामांची गुणवत्ता आणि प्रशासकीय कारभाराबाबत अधिकच उपस्थित झाले असून नागरिक, सामाजिक संघटना आणि राजकीय वतुर्ळांचे या प्रकरणाकडे लक्ष लागले आहे. पुढील चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असणार आहे.

भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे

छत्रपती संभाजीनगर येथील सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर वाढल्याचा गंभीर आरोप होत असून भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. कंत्राटदारांच्या नावाखाली काही राजकीय नेत्यांनी थेट शिरकाव केल्यामुळेच विभागातील भ्रष्टाचार अधिकच बोकाळल्याचा आरोप केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रस्ते, इमारत बांधकाम आणि दुरुस्तीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याच्या संशय व्यक्त केला जात आहे. प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असताना कागदपत्रांवर मात्र दर्जेदार काम दाखवून कोटयवधी रुपयांची बिले मंजूर केली जात असल्याचे आरोप आहेत. काही कामे अपूर्ण असतानाही ती पूर्ण झाल्याचे दाखवून निधी काढण्यात आल्याचे दावेही पुढे येत आहेत.

या कथित गैरप्रकारांमध्ये कंत्राटदार, अधिकारी आणि राजकीय हस्तक्षेप यांचे संगनमत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राजकीय दबावामुळे नियम डावलले जात असून पारदर्शकतेचा पूर्ण अभाव आहे, असा आरोप संबंधितांनी केला आहे. त्यामुळे प्रामाणिक अधिकाऱ्यांवरही दबाव येत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, या प्रकरणी सखोल आणि स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. शासक प्रशासनाकडून मात्र या आरोपांवर अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नसून प्राथमिक चौकशी सुरू असल्याचे सूत्रांकडून समजले.या आरोपांमुळे छत्रपती संभाजीनगरातील विकासकामांची गुणवत्ता, सरकारी निधीचा वापर आणि प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून पुढील चौकशीतून नेमके काय उघड होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नेहमीच या विभागासमोर कुणी ना कुणी उपोषणास बसलेले असतोच.

पीडब्ल्यूडी विभागात भ्रष्टाचार झाल्याचे १५डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेले वृत्त

घृष्णेश्वर मंदिर येथे महाशिवरात्रीला निशीथ काळातील शासकीय पूजेची पवित्र परंपरा संपन्न

दिनेश परदेशी
(अट्टल मत प्रतिनिधी)

वेरूळच्या बाराव्या ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरात महाशिवरात्रीला रात्री १२:०० नंतर (निशीथ काळात) होणारी शासकीय पूजा ही अहिल्याबाई होळकर काळापासून चालत आलेली एक पवित्र परंपरा आहे. ही पूजा राज्याची सुख-समृद्धी, भक्ती आणि शांततेचे प्रतीक मानली जाते. ही पूजा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या काळापासून सुरू असल्याची माहिती मिळते.

प्रशासनाच्या वतीने ही पूजा केली जाते, जी शिवाचे आशीर्वाद मिळवण्यासाठी आणि राज्यावरील संकट दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जाते. निशीथ काळ (रात्री १२:००): महाशिवरात्रीच्या रात्री १२:०० वाजता शिव आणि शक्तीचे मीलन मानले जाते, जो पूजेसाठी सर्वात पवित्र वेळ असतो. घृष्णेश्वर हे बारावे ज्योतिर्लिंग असल्याने या विशेष रात्रीच्या पूजेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते, ज्यामुळे शिवभक्तांची गर्दी होते. श्री. वीरेन्द्र मिश्र विशेष महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, डॉ. विनयकुमार राठोड (आय. पी.एस) पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सप्तनीक अभिषेक केला. यांच्यासह माजी खासदार चंद्रकांत खैरे व इतरांनी अभिषेक व पूजा केली. घृष्णेश्वर मंदिर समितीतर्फे या सर्वांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी साहेब यांच्या लग्नाचा वाढदिवस घृष्णेश्वर चरणी धार्मिक वातावरणात संपन्न.

योगायोगाने आज १६ रोजी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या लग्नाचा ही वाढदिवस असल्याने घृष्णेश्वराच्या साक्षीने पुन्हा एकदा आपल्या पत्नीस हार घालून दिलीप स्वामी साहेबांनी शुभेच्छा दिल्या! हे होत असताना पोलीस अधीक्षक ग्रामीण डॉ. विनयकुमार राठोड साहेब लगबगीने आले व थांबा आम्हालाही या लग्नाचे साक्षीदार होवू द्या. असे म्हणत शुभेच्छा दिल्या.

बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर

घृष्णेश्वर मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर आहे. वेरूळपासून अवघ्या दीड किलोमीटरवर असलेले घृष्णेश्वर हे शंकर मंदिर भारतातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. तसेच बारा ज्योतिर्लिंगातील हे शेवटचे ज्योतिर्लिंग आहे.शिवपुराण, स्कंदपुराण, रामायण, महाभारत या ग्रंथांत या मंदिराचे उल्लेख दिसून येतात. वेरूळ गावातील येलगंगा नदीजवळ हे मंदिर असून छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचे आजोबा आणि शहाजीराजे भोसले यांचे वडील मालोजीराजे भोसले यांनी या मंदिराचा १६ व्या शतकात पहिल्यांदा जीर्णोद्धार केला होता. सध्याचे अस्तित्वात असलेले मंदिर इ.स. १७३० मध्ये मल्हारराव होळकरांच्या पत्नी गौतमीबाईंनी बांधलेले असून नंतर शिवभक्त अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा परत एकदा जीर्णोद्धार केला.

या मंदिराचे बांधकाम लाल रंगांच्या दगडाम ध्ये करण्यात आले आहे. या मंदिराचे नक्षीकाम अवर्णनीय आहे. या मंदिराला २७ सप्टेंबर १९६० रोजी राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले.

घृष्णेश्वर मंदिराची वास्तुकला..

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात पारंपारिक दक्षिण भारतीय वास्तू पाहता येते. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात अंतर्गत कक्ष आणि गर्भगृह आहे. या मंदिराचे बांधकाम, ४४०० चौरस फूट क्षेत्रावर पसरलेले आहे. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगमंदिर परिसरामध्ये पाच-स्तरीय उंच शिखर आणि अनेक खांब आहेत, जे पौराणिक गुंतागुंतीच्या कोरीव कामाच्या स्वरूपात बांधलेले आहेत. मंदिराच्या आवारात बांधलेल्या लाल दगडी भिंती मुख्यतः भगवान शिव आणि भगवान विष्णू यांचे दहा अवतार दर्शवितात. गर्भगृहात पूर्वेकडे शिवलिंग असून तेथे नंदीस्वरची मूर्तीही दिसते. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाची कहाणी पती-पत्नी जोडप्या सुधर्मा आणि सुधा यांच्या कथेपासून सुरू होते. दोघेही त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदी होते, परंतु ते बालसुखापासून वंचित होते आणि हे सिद्ध झाले की सुदेहा कधीही आई होऊ शकत नाही. म्हणून सुदेहाने तिचा पती सुधर्मा हिची धाकटी बहीण घुश्मासोबत लग्न केले. वेळ गेला आणि घुश्माच्या गर्विष्ठतेपासून, एक सुंदर मुलाचा जन्म झाला. पण हळू हळू तिच्या हातातून तिचा पती, प्रेम, घर आणि आदर जात असल्याचे पाहून सुधाच्या मनात ईर्षेची बीजं फुटू लागली आणि एके दिवशी संधी पाहून तिने मुलाची हत्या केली आणि त्याच तळ्यामध्ये त्याचे शरीर त्या तलावात दफन केले ज्यात घुश्मा शिवलिंगाचे विसर्जन करत होती. सुधर्माची दुसरी पत्नी घुश्मा, जी भगवान शिवची भक्त होती, ती दररोज सकाळी उठून १०१ शिवलिंगे बनवून पूजन करायची आणि नंतर तलावामध्ये विसर्जित करत असे. मुलाची बातमी ऐकून चहूबाजूंनी आक्रोश झाला, पण दररोज प्रमाणेच, घुश्माही शिवलिंग बनवून शांत मनाने भगवान शिवाची पूजा करत राहिली आणि जेव्हा ती तलावात शिवलिंगाचे विसर्जन करायला गेली, तेव्हा तिचा मुलगा जिवंत बाहेर आला आला. त्याच वेळी भगवान शिव सुद्धा घुश्माला दिसले, भोलेनाथ सुधाच्या या कृतीवर रागावले आणि तिला शिक्षा आणि
घुश्माला वरदान देऊ इच्छित होते. पण घुश्माने सुधेला क्षमा करावी अशी विनवणी केली आणि भगवान शंकराला लोकांच्या कल्याणासाठी येथे राहण्याची प्रार्थना केली. घुश्माची विनंती मान्य करून भोलेनाथ शिवलिंगाच्या रूपाने येथेच राहू लागले आणि हे स्थान जगभरात घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध झाले. घृष्णेश्वर मंदिराजवळ एक तलाव आहे.ज्याचं नाव शिवालय तलाव असे आहे.भाविक लोक घृष्णेश्वर मंदिरासोबत या तलावाला देखील मोठ्या भक्ती भावाने भेट देतात.

शंकर भोलाभाला जगाचा पालनवाला

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व हिंदू धर्माचे तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे.परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच 'शिव-पार्वती' आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार -पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदु म न्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते. भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचम डी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते.त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे. आज स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते.आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे.आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे.त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे

गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे.त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे ॐ नमो: शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते,शांती मिळते, आरोग्याच्या दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना 'हर हर महादेव'चा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा 'हर हर महादेव 'चा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विघ्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे. कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन म हाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती उष्णता,अती थंडी,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे.अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.

आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय,भुकंप,अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते. देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानच्या सान्निध्यातील काणा -कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.म हाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.

कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल.त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल.हर हर महादेव!

– रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

महास्वच्छता अभियान; आमदार-अधिकारी-कर्मचारी रस्त्यावर आणि वेरुळ चकाचक

स्वच्छता हीच ईश्वर सेवा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

स्वच्छतेत सातत्य राखणे गरजेचे- आ. प्रशांत बंब

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजसेवी संस्था असे तब्बल २००० लोक झाडू घेऊन वेरुळच्या रस्त्यांवर उतरले आणि वेरुळ चकाचक झाले. श्री क्षेत्र घ्रुष्णेश्वर मंदीर परिसर, येळगंगा नदी, मालोजीराजे भोसले गढी परिसर, अरिहंत चौक. लेणी परिसर तसेच गावातील महत्त्वाची मैदाने आदी परिसरात ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

स्वच्छता हीच ईश्वर सेवा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले तर स्वच्छता ही निरंतर बाब असून त्यात सातत्य राखणे गरजेचे आहे,असे मत आ. प्रशांत बंब यांनी व्यक्त केले. वेरुळ येथे म हाशिवरात्रीनिमित्त मोठ्या संख्येने भाविक येत असतात. त्यापार्श्वभुमिवर आज वेरुळ येथे महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. आ. प्रशांत बंब, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड तसेच सर्व शासकीय विभागांचे प्रमुख, विविध समाजसेवी संस्थांचे पथके आदी उपस्थित होते. वेरुळ गावातील वेरुळ लेणी ते अरिहंत चौक, कैलास हॉटेल ते येळगंगा नदी, येळगंगा नदी ते

तलाठी ऑफिस, मालोजीराजे भोसले गढी, तीर्थकुंड ते भोसले चौक, भोसले चौक ते कसाबखेडा रोड आदी परिसरात बाजार तळ, कब्रस्थान, एमटीडीसी पार्कींग, म हादेव उद्यान, दर्गा दावल मलिक, भीमनगर परिसर अशा भागात विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते, स्थानिक गावकरी आदींनी आपले श्रम दान करुन स्वच्छता केली.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत यांनी सांगितले की, यात्रोत्सवाच्या पार्श्वभुमिवर स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायती मार्फत दैनंदिन स्वच्छता राबविण्यात येते. गावातील लोकांनी आपल्या परिसराची स्वच्छता राखणे गरजेचे आहे. आ. प्रशांत बंब म्हणाले की, महाशिवरात्रीनिमित्त वेरुळ येथे देशभरातील भाविक येतात. त्यांना या ठिकाणी स्वच्छता व सुविधा उपलब्ध करणे हे आपले कर्तव्य आहे. स्वच्छता ही निरंतर बाब असून त्यात सातत्य असणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, स्वच्छता हीच खरी ईश्वरसेवा आहे.

आपल्या जिल्ह्यात असलेले हे मोठे तीर्थक्षेत्र आहे. येथे येणाऱ्या भाविकांना स्वच्छता व सेवा मिळायला हवी. येथे जर अस्वच्छता असली तर ती बाब आपल्याला भुषणावह नाही. आपण सर्व विभाग व स्वयंसेवी संस्था मिळून २ हजार लोकांचे श्रमदान करुन मंदिर व वेरुळ परिसर स्वच्छ करु या,असे आवाहन त्यांनी केले.

छत्रपती संभाजीनगरात २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान भव्य साहित्योत्सव; प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना 'साहित्यभारती जीवनगौरव' पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती आणि स. भु. शिक्षण संस्थेच्या वतीने येत्या २०, २१, आणि २२ फेब्रुवारी रोजी साहित्योत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या साहित्योत्सवात विविध विषयांवर चर्चासत्रे, कवीसंमेलन, नाट्यछटा सादरीकरण असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. या साहित्योत्सवात मराठीतील ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना 'साहित्यभारती जीवनगौरव' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती या उत्सवाचे स्वागताध्यक्ष मंत्री अतुल सावे यांनी शनिवारी एका पत्रपरिषदेत दिली.

या पत्र परिषदेला स. भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, प्रदेश कार्याध्यक्ष शशिकांत घासकडबी, महामंत्री प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर निमंत्रक प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, कार्यवाह आर्कि. डॉ. अनिरूद्ध नाईक, कार्याध्यक्ष डॉ. विकास कापरे हे उपस्थित होते.

'जागर प्रतिभेचा' युवा मनाचा' ही थीम महोत्सवाची राहणार असून, राज्यातील युवक मोठ्या प्रमाणात महोत्सवाला उपस्थित राहणार आहेत. दि. २० (शुक्रवार) रोजी दुपारी चार वाजता ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. क्रांती चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून सुरू होणारी ही दिंडी पैठण गेटमार्गे स. भु. परिसरात पोहचेल. या ग्रंथदिंडीत भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध पथकांचा समावेश राहणार आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत श्रीकांत उमरीकर लिखित 'गोदेचा हा वसा..शब्दांचा हा वारसा' हा मराठी कविता अभंग, ओवी, स्तोत्र यावर आधारित कार्यक्रमाचे सादरीकरण होणार आहे, असे सावे यांनी सांगितले.

विविध विषयांवर चर्चासत्रे

उद्घाटन समारंभानंतर 'राष्ट्र उभारणीत सकस साहित्याचे योगदान' या विषयावर इंद्रजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे. प्रा. बळीराम गायकवाड, प्रा. प्रदीप ढवळ, आशिष मालसे त्यात सहभागी होतील. नाट्यछटा सादरीकरण आणि त्यावरील चर्चेत अभिराम भडकमकर, राजकुमार येल्लावाड, प्रा. जयंत शेवतेकर यांचा सहभाग राहणार असून, , राजश्री पोहेकर, सुजाता पाठक, अवंती कुलकर्णी व पारितोषिक विजेते कलाकार सादरीकरण करणार आहेत.

'२१ व्या शतकातील स्त्री साहित्यिकांची अभिव्यक्ती' या विषयावर मीरा निचले, माहेश्वरी गावित, प्रा. सुनिता सांगोळे, मीनल वसमतकर यांच्या उपस्थितीत परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री 'महाराष्ट्राची लोकधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

अभिरूप न्यायालय, कवीसंमेलन

दि. २२ रोजी सकाळी 'समाज माध्यमावरची अभिव्यक्ती' हा परिसंवाद होणार असून, त्यात निकिता भागवत,विनोद जैतमहल, मोहिनी मोडक, प्रीतम निकम, तुषार दामगुडे आदी सहभागी होणार आहेत. 'वाचनाने आम्हाला काय दिले?' या विषयावरील परिसंवादात प्रा. डॉ.पृथ्वीराज तौर, समीरा गुजर, सरदार जाधव, मधुरा वेलणकर, मनोहर शिरसाठ सहभागी होतील. दुपारी ११ ते १ वाजेपर्यंत निमंत्रित आणि पारितोषिक विजेते कवींचे संमेलन होणार आहे. अभिरूप न्यायालयाचा एक कार्यक्रम होणार असून, आजची भाषा इन्स्टाग्राम, 'रिल्स आणि कविता – विरोध की संधी?' हा त्याचा विषय आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानी न्या. अंबादासराव जोशी राहणार असून, शिव कदम, मुरहरी केळे, प्रा. दिलीप बिरुटे, भारत अमदापुरे यांचा त्यात सहभाग असेल. 'हातात विश्व, मनात प्रश्न : आजचे युवा साहित्य कुठे चालले आहे?' हा परिसंवाद प्रा. रवींद्र बेंबरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, शशिकांत घासकडबी, रेखा ढेरे, विजय लोहारे, अरुण ठोके यांचा त्यात सहभाग राहणार आहे.

प्रा. कवठेकरांचा सन्मान

समारोप सत्रात दुपारी ४.३० वाजता मराठीतील ख्यातनाम समीक्षक प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना साहित्य भारती तर्फे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, २१००० रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. समारोपाचे भाषण प्रा. कवठेकर करणार आहेत.

या कार्यक्रमाला अ. भा. साहित्य परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दिनेश प्रतापसिंह, प्रदेश संघटन मंत्री नितीन केळकर, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.पंकजा वाघमारे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या साहित्योत्सवात होणारे कार्यक्रम असे :

शनिवार दि २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता स. भु. परिसरात ग्रंथ प्रदर्शनी, भाषा वैभव प्रदर्शनी, गड किल्ले प्रदर्शनी, सेल्फी पॉइंट आदीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. दहा वाजता सुप्रसिद्ध लेखक आणि दिग्दर्शक अभिराम भडमकर यांच्या हस्ते साहित्योत्सवाचे उद्घाटन होईल. या वेळी स. भु. संस्थेचे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील, साहित्य अकादमीचे सदस्य प्रा. नरेंद्र पाठक, सुप्रसिद्ध कवी देवीदास फुलारी, साहित्योत्सवाचे कार्याध्यक्ष डॉ. विकास कापरे, प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बळीराम गायकवाड, प्रदेश कार्याध्यक्ष शशिकांत घासकडबी, प्रांताध्यक्ष प्राचार्य संजीव गिरासे, प्रांत कार्याध्यक्ष उमेश काळे, निमंत्रक प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, कार्यवाह डॉ. आर्कि. अनिरुद्ध नाईक उपस्थित राहणार आहेत.

वेरूळ येथे महाशिवरात्रीनिमित्त संत शिरोमणी गुरु रविदास संस्थान (ट्रस्ट) यांच्या वतीने जंगी भजन स्पर्धा व महाप्रसाद; सामाजिक बैठक व सत्कार समारंभ

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

वेरूळ (ता. खुलताबाद) – वेरूळ येथे महाशिवरात्रीनिमित्त श्री संत शिरोमणी गुरु रविदास संस्थान (ट्रस्ट) यांच्या वतीने गुरु रविदास महाराज यांच्या मंदिरात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जंगी भजन स्पर्धा, सामाजिक बैठक, मान्यवरांचा सत्कार समारंभ तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवार, १५ फेब्रुवारी रोजी रात्री फराळ व चहा कार्यक्रमानंतर जंगी भजनाचा कार्यक्रम पार पडला. विविध भजन मंडळांनी सादर केलेल्या भक्तिगीतांनी परिसर भक्तिमय झाला. सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी रात्रीपासून पहाटेपर्यंत भजन कार्यक्रम झाला. सकाळी चहा-नाश्त्यानंतर सकाळी ९ ते ११.३० या वेळेत सामाजिक व मंदिर जिर्णोद्धारासंदर्भातील बैठक घेण्यात आली. दुपारी १२ ते ५ दरम्यान महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रम पार पडला. महाप्रसादासाठी अन्नदाता म्हणून इंजि. अनिल मोतीलाल निंभोरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

संस्थानच्या नियोजित मंदिराचे जिर्णोद्धाराचे काम अंतिम टप्प्यात असून आजपर्यंत समाजातील बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे. उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी समाजबांधवांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे, असे आवाहन विश्वस्तांनी केले.

या कार्यक्रमास बदनापूर मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे, गंगापूर-खुलताबाद मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब, जिल्हा परिषद सदस्य बालाजी सोनटक्के व अमोल लोहकरे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले असून समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

क्रांती चौकात महानायक एकलव्य जयंती उत्साहात साजरी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

येथील क्रांती चौक येथे महानायक एकलव्य यांची जयंती मोठ्या उत्साहात व सामाजिक एकात्मतेच्या वातावरणात साजरी करण्यात आली. सकल भिल समाजासह सर्व समाजघटकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून जयंती उत्साहात साजरी केली.

कार्यक्रमाची सुरुवात महानायक एकलव्य यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. एकलव्य यांच्या त्याग, समर्पण आणि गुरुभक्तीच्या आदर्शांचे स्मरण करून समाजात शिक्षण, एकजूट आणि प्रगतीचा संदेश देण्यात आला.

या वेळी एकलव्य सामाजिक संघटनेचे शहराध्यक्ष मंजीत गायकवाड, जिल्हाध्यक्ष विठ्ठल गायकवाड, पप्पू माळी, महिला जिल्हाध्यक्ष मीरा पवार, सामाजिक कार्यकर्ते उत्तम पवार, सोमीनाथ गायकवाड, शिवाजी मोरे यांच्यासह समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महानायक एकलव्य यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजातील युवकांनी शिक्षण, क्रीडा आणि सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

समाजात बंधुभाव आणि एकात्मता वाढीस लागावी, तसेच एकलव्य यांचा आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात घोषणाबाजी, अभिवादन आणि समाजबांधवांमधील स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

जयंतीनिमित्त उपस्थितांनी महानायक एकलव्य यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. कार्यक्रमास सकल भिल समाजासह विविध समाजघटकांचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानतर्फे

मराठवाड्यात शिवजयंतीनिमित्त शिवस्मारक यात्रा

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

१९ फेब्रुवारीच्या शिवजयंतीनिमित्त मराठवाड्यात स्थापित होणाऱ्या अश्वारूढ पुतळ्यांच्या शिवस्मारक यात्रेला शनिवारी (ता. १४) जालना जिल्ह्यातील महाकाळा (ता. अंबड) येथून उत्साहात प्रारंभ झाला. महाराष्ट्र राज्य धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या पुढाकारातून आयोजित या यात्रेचे दुपारी छत्रपती संभाजीनगर येथील ऐतिहासिक क्रांती चौक येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

बाळराजे आवारे पाटील यांचा पुढाकार

फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात स्वागत

महाकाळा येथून आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ५१ भव्य अश्वारूढ पुतळ्यांचे शहरात फटाक्यांच्या आतषबाजीत आणि ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. हजारो शिवभक्तांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. प्रारंभी सर्व पुतळ्यांचे पूजन करण्यात आले.

५१ वाहनांमधून भव्य प्रतिकृतींची मिरवणूक

शिवस्मारक यात्रेत सजविलेल्या ५१ वाहनांमधून छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ पुतळे, विविध महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे तसेच श्रीराम, विठ्ठल-रुक्मिणी, महादेव यांच्या मूर्ती आणि गाय-वासरू प्रतिमा यांचा समावेश आहे. संपूर्ण यात्रा आकर्षक सजावटीमुळे नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.

आठ जिल्ह्यांमधून यात्रेचा प्रवास – शिवजयंतीनिमित्त मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत ही यात्रा जाणार आहे. यात्रेचा समारोप मंगळवारी (ता. १७) माजलगाव येथे होणार आहे.

यात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे आहे : परभणी – छत्रपती शिवाजी महाराज चौक, हट्टा, औंढा नागनाथ, हिंगोली, कळमनुरी, नांदेड – शिवाजी महाराज चौक, अहम दपूर (मुक्काम) सोमवारी (दि. १६) अहम दपूर येथून यात्रा लातूर, औसा, तुळजापूर, धाराशिव, तेर, ढोकी मार्गे कळंब येथे मुक्कामी थांबेल. मंगळवारी (ता. १७) कळंब येथून केज, अंबाजोगाई, परळी मार्गे माजलगाव येथे यात्रेचा समारोप.

शिवविचारांचा प्रसार हा मुख्य उद्देश

"समाजातील प्रत्येक व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक बांधिलकी जपावी. त्यांच्या विचारांचे आणि कर्तृत्वाचे आचरण प्रत्येकाने आपल्या जीवनात करावे, हा या शिवस्मारक यात्रेमागील प्रमुख उद्देश आहे. या यात्रेसाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी झाले असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मी माझे कार्य करताना चांगलाच विचार करतो आणि तेही मनापासून त्यामुळे शिवरायांच्या आशीर्वादाने कार्य तडीस नेण्याचे बळ मिळते.

– बाळराजे आवारे पाटील
संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान

जागतिक मूत्रपिंड दिवस हा जगभर मार्च महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी साजरा केला जातो. मूत्रपिंडे ही शरीरातील अत्यंत महत्त्वाचे अवयव आहेत. यांची योग्य ती काळजी न घेतल्यामुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण खूप वाढले आहे. समाजात याविषयी मोठ्या प्रमाणावर जागृती करण्यासाठी हा दिवस जागतिक पातळीवर साजरा केला जातो.

जागतिक मूत्रपिंड दिनानिमित्त कृतज्ञता समारंभ व स्नेहसंमेलनाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

ओरिऑन सिटी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, बर्नेला किडनी केअर आणि इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम.

'जागतिक मूत्रपिंड दिन' निमित्त ओरिऑन सिटी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, बर्नेला किडनी केअर आणि इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कृतज्ञता समारंभ व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश मूत्रपिंडाच्या आजारांबाबत समाजात व्यापक जनजागृती करणे, अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि अवयवदान म्हणजे जीवनदान हा संदेश अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. अवयवदाते आपल्या निःस्वार्थ धाडसामुळे इतरांना नवजीवन देतात. त्यांच्या या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपणानंतर नवजीवन लाभलेल्या रुग्णांना प्रोत्साहन देणे, हा या कार्यक्रमा मागील महत्त्वाचा हेतू आहे.

हा कार्यक्रम औपचारिक वैद्यकीय परिसंवाद नसून, सामाजिक बांधिलकी जपणारा आणि आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारा उपक्रम आहे. समाजात अवयवदानाबाबत असलेले गैरसमज दूर व्हावेत, अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानासाठी पुढाकार घ्यावा आणि आरोग्याबाबत सजगता वाढावी, यासाठी या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाची रूपरेषा, उद्दिष्टे आणि पुढील नियोजन याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. प्रवीण सोनवतीकर, डॉ. आशिष देशपांडे, डॉ. योगेश वरगंटवार, डॉ. श्रीगणेश बर्नेला, डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. शिरीष देशमुख, डॉ. सुनील जाधव, डॉ. आशिष देशमुख, डॉ. विरेंद्र वडगावकर, डॉ. पांडुरंग वट्टमवार, डॉ. योगेश देवगिरीकर, डॉ. राजकुमार घुमरे तसेच ओरिऑन सिटी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे इतर मान्यवर डॉक्टर उपस्थित होते.

कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याचा राजकारणात विजयाचा झेंडा

राजकारणाच्या मैदानात उतरताच पहिल्याच बॉलमध्ये सिक्स

पोलीस सेवेतून लोकसेवेकडे; बालाजी सोनटक्केंचा दमदार विजय

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

सेवानिवृत्त सहायक पोलीस आयुक्त बालाजी रघुनाथ सोनटक्के जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२६ मधील वाळूज गट (३९) मधून विजयी झाले आहेत. सोनटक्के मराठवाडा पोलिस अधिकारी-कर्मचारी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. संघटनेचे पदाधिकारी आणि सदस्यांसह पोलिस दल आणि मित्रपरिवारांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बालाजी सोनटक्के मूळचे नांदेड जिल्ह्यातील असून, पोलीस दलातील त्यांचा बहुतांश सेवाकाळ छत्रपती संभाजी नगरमध्ये व्यतित झाला.

बालाजी सोनटक्के १९९१ च्या बॅचचे पी.एस.आय. असून, त्यानंतर ते पोलीस निरीक्षक (पी.आय.) झाले. पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती झाल्यानंतर पोलीस अधीक्षक (ग्रामीण) कार्यालयाअंतर्गत पिशोर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणूनही त्यांनी यशस्वी कार्यभार सांभाळला. शहरात क्रांती चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. मध्यंतरी काही काळ लातूर जिल्ह्यात गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणूनही सोनटक्के यांनी नेत्रदीपक कामगिरी केली.

अनेक गुन्ह्यांचा छडा

पोलीस आयुक्तालयांतर्गत विविध पोलीस ठाण्यांमध्ये यशस्वी कर्तव्य बजावतानाचा नगर जिल्ह्यातील एका बलात्कारासह दरोड्याच्या गुन्ह्याचा छडा लावण्याची उल्लेखनीय कामगिरी सोनटक्के यांनी केलेली आहे. सोनटक्के यांचा महाराष्ट्रातील पारध्यांच्या टोळ्यांचा दांडगा अभ्यास असल्यामुळे या गुन्ह्यातील आरोपींना ते अटक करू शकले. नगर जिल्ह्यातील हे प्रकरण राज्यभर चांगलेच गाजले होते. काही काळ वाळूज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणूनही बालाजी सोनटक्के यांची कारकीर्द चांगलीच गाजली. वाळूजमध्ये त्यांनी अनेक गुन्ह्यांचा यशस्वी तपास करून गुन्हेगारांना गजाआड केले होते. वाळूज पोलिस ठाण्यांतर्गत बारा-पंधरा गावे येतात. स्वच्छ आणि पारदर्शी कारभार तसेच सर्व नागरिक सोनटक्के यांच्या कामगिरीवर जाम खूष असल्यामुळे सोनटक्के यांना जि. प. निवडणुकीत घवघवीत यश मिळाल्याचे बोलले जात आहे. जि. प. निवडणुकीत विजयी झाल्याच्या प्रीत्यर्थ २२ फेब्रुवारी रोजी बालाजी सोनटक्के यांचा मराठवाडा पोलिस अधिकारी आणि कर्मचारी संघटनेतर्फे सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक दिगंबर गाडेकर आणि सेवानिवृत्त उपअधीक्षक रामनाथ चोपडे यांनी दिली.

सामाजिक बांधिलकी, सर्वसामान्यांशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद आणि विकासाभिमुख दृष्टीकोन यामुळे मतदारांनी त्यांना कौल दिल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे वाळूज परिसराच्या विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

गुन्हेगारीविरोधातील धडाकेबाज कारवाई

पोलीस आयुक्तालयांतर्गत विविध ठाण्यांमध्ये काम करताना सोनटक्के यांनी अनेक गंभीर गुन्ह्यांचा छडा लावला. नगर जिल्ह्यातील गाजलेल्या दरोडा व बलात्कार प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या धाडसी, तत्पर आणि कर्तव्यदक्ष कामगिरीबद्दल त्यांना अनेक वेळा प्रशस्तीपत्रे व सन्मान प्राप्त झाले आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही
(यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199